# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## केस क्रं. ग्रागानिमं/नाशप/३८ /२००९

| | | |
|---|---|---|
| अर्जदार | : | श्री शिवाजी रामजी पाटील<br>घोडे प्लॉट, वार्ड नं. 12,<br>काटोल,<br>जिल्हा नागपूर. |
| | | – विरूध्द – |
| गैरअर्जदार | : | कार्यकारी अभियंता,<br>काटोल विभाग,<br>म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,<br>काटोल. |
| गणपूर्ती | : | 1) श्री एस.एफ.लांजेवार<br>कार्यकारी अभियंता तथा<br>सदस्य–सचिव,<br>ग्राहक गा–हाणे निवारण मंच<br>नाशप, नागपूर.<br>2) श्रीमती गौरी चंद्रायण, सदस्या<br>ग्राहक गा–हाणे निवारण मंच<br>नाशप, नागपूर. |

(आदेश पारीत दिनांक १४.०८.२००९)
मंचाचे निर्णयान्वये श्री एस.एफ.लांजेवार, सदस्य–सचिव

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यानी तक्रार अर्ज दिनांक 15.06.2009 रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम 6.4 विनियम 2006 प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशिल :–

म.रा.विज नियामक आयोगाव्दारे निर्धारण केलेला भरपाई निश्चीतीकरण अंतर्गत भरपाई मिळण्याबाबत अर्जदाराची विनंती क्रं. 1. म.रा. विज नियामक आयोगाव्दारा निर्धारीत केलेल्या भरपाईचे निश्चीतीकरण अंतर्गत भरपाई मिळण्याबाबत देण्यासाठी योग्य तो आदेश पारीत करावा.

अर्जदाराची मागणी :–

झालेल्या मनस्थापाकरीता रू. 10,000 व परिछेद क्रं. 5 प्रमाणे झालेले नुकसान भरपाई देण्याची व्यवस्था करावी. अर्जदार श्री शिवाजी रामजी पाटील हयांनी दिनांक ०१.०६.२००९ ला तक्रार ग्राहक मंचाला दिली. त्यांनी खालील मुद्दे उपस्थित केले.

अर्जदाराने अर्जासोबत सहाय्यक अभियंता उपविभाग काटोल हयांना दि. 09.01.2009 ला म.रा.विज नियामक आयोग व्दारा निर्धारीत केलेला नुकसान भरपाई मिळण्याबाबत अर्ज केला त्यांत त्यांनी असेही नमुद केले आहे की, त्यांनी वरील विषयाबाबत दोनदा कळविले आहे तसेच दि. 28. 10.2006 रोजी विजपूरवठा सुरू केला, त्यासंबधीत झालेल्या नुकसानी बाबत भरपाई देण्यासंबधी आजपर्यत कोणतीच व्यवस्था केलेली नाही असे नमुद केलेले आहे.

तसेच दिनांक 30.03.2007 चा पत्रात श्री शिवाजी रामजी पाटील हयांनी असे नमुद केले आहे की,

1) विज पूरवठया करिता दि. 18.06.2004 ला अर्ज दिला
2) मागणी पत्र प्राप्त झाले व त्याप्रमाणे रकमेचा भरणा केला व दि. 23.08.2004 ला चाचणी पत्र दिले व रक्कम भरल्याची पावती दिली.
3) दि. 26.04.2005 ला ग्राहक गा–हाणे मंच हयांचेकडे तक्रार केली व दि. 09.06.2005 रोजी आदेश पारित होवून दि. 15.10.2005 पर्यंत विद्युत पूरवठा करण्यासंबंधी सुचना करण्यांत आल्या होत्या परंतू विज पूरवठा दि. 28.10.2006 रोजी करण्यात आला. त्यामुळे विज नियामक आयोगाच्या नियमाप्रमाणे त्यांना भरपाई देण्यांची व्यवस्था करावी.

4) विज जोडणी करीता लागणारे सिमेंट खांब त्यांचे जागेवरून माझ्या शेतात स्व खर्चाने पोहचविले त्यासाठी रू. 2000/— खर्च आला.

5) आदेशानुसार दि. 15.10.2005 रोजी विज जोडणी मिळणार होती. त्यासाठी लागणा—या सर्व साहित्यासह मिटर पेटी बसविली व विज सुरू झाल्यास गहु, हरभरा, संत्रा झाडे यांना ओलित होईल या आशेने 1 क्विंटल गहु, 1 क्विंटल वना ही पेरणी केली परंतु विज जोडणी न झाल्यामुळे माझ्या वरील मालाचे नुकसान झाले व संत्रा झाडे 150 वाळली, आणि मिटर पेटी चोरीस गेली, असे एकुण 30,000/— रूपयाचे माझे नुकसान झाले.

6) या सबंधात दि. 30.03.2007, दि.14.08.2008 व 09.01.2009 रोजी मा. सहाय्यक अभियंता यांना लेखी पत्र दिले, सोबत झेरॉक्स जोडली आहे.

गैरअर्जदारने आपले लेखी निवेदनात खालील बाबी नमुद केल्यात.

1) श्री शिवाजी रामजी पाटील मु. काटोल मौजा गंगालडोह हयांचे शेती पंपाला वीज जोडणी जेष्ठता यादीमध्ये कं. 125 होता व त्यामुळे त्यांना 28.10.2006 ला विज पूरवठा देण्यांत आला.

2) ग्राहक मंचाच्या आदेशानुसार विजपूरवठा दि. 15.10.2005 च्या आत देण्याचे निर्देश देण्यांत आले होते परंतू साहीत्या अभावी व जेष्ठता यादीनुसारच कृषी पंपाचे काम करण्यांत येते त्यामुळे आदेशाचे पालन ततोतंत करता येवु शकले नाही हयाबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला.

3) विज जोडणीकरीता लागणारे सिमेंट खांब कंत्राटव्दारे जागेवर ट्रांसपोर्ट करण्यांत आले होते पुराव्यादाखल पत्र जोडले आहे.

4) विद्युत लाईनचे काम होण्यापूर्वीच शेतात झाडे लावणे व त्या जागेवर पेरणी करणे व ओलीत न झाल्यामुळे नुकसान भरपाई मागणे व नुकसान करीता म.रा. विज विद्युत कं. ला जबाबदार धरणे योग्य नाही, नुकसान भरपाई ठरविण्याचे अधिकार पटवारी व तहसील कार्यालयात आहे ग्राहकाची मिटर पेटी किंवा मोटार पंपाच्या सुरक्षेची लेखी जबाबदारी स्वतः ग्राहकाचीच आहे असेही नमुद केले आहे.

गैरअर्जदाराने दि. 18.02.2009 ला श्री शिवाजी रामजी पाटील हयांना पत्रा व्दारे कळविले की आपले शेतीपंपाची विजजोडणी उप विभागातील विज जोडणीच्या जेष्ठता यादीनुसार (जेष्ठता क्रं. 125) असल्यामुळे आपणास त्वरीत विजपूरवठा देता आला नाही. तरीपण आपणांस विज जोडणी लवकर देण्याचा प्रयत्न करण्यांत आला.

कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्यादित काटोल हयांनी दि. 06.06.2005 ला अधिक्षक अभियंता नागपूर ग्रामिण हयांना पत्र क्रं. काअ/काटोल/टी/2431 हे पत्र लिहुन वरील पंपाचे कनेक्शन देण्याबाबत मार्गदर्शन मागीतले त्यांत त्यांनी सर्व बाबींचा उहापोह केला. तसेच तिन महीन्यांचा आंत विद्युत पुरवठा न दिल्यास दंडात्मक कार्यवाही होवू शकते हे सुध्दा नमुद केले आहे. तसेच त्यांनी पत्र क्रं. अअ/टीआसी / 22052 दि. 02.07.2005 address to the secretary MERC तांत्रीक संचालक (EHVP-Comm.-TRC) व पत्र क्रं. representation no. 49 of 2006 order of the Ombudsman dated 22nd August 2006 च्या आर्डरची प्रत जोडलेली आहे.

सदर केसची सुनावणी दि. 01.07.2009 ला झाली. त्यांत अर्जदाराच्या वतीने श्री शिवाजी रामजी पाटील हे स्वतः व गैरअर्जदाराचा वतीने श्री भगत सहाय्यक अभियंता काटोल हे हजर होते सुनावणी काही कारणास्तव पूढे ढकलण्यांत आली.

सुनावणी पुन्हा 28.07.2009 सुरवात झाली सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री शिवाजी रामजी पाटील व गैरअर्जदार श्री भगत सहाय्यक अभियंता काटोल हे हजर होते.

अर्जदाराने सुनावणीच्या वेळी विद्युत पूरवठा वेळेवर न दिल्यामुळे त्यांचे पिकांचे नुकसान झाले त्याची नुकसान भरपाई देण्याचे सांगीतले तसेच गैरअर्जदाराकडुन विज पूरवठा देण्याकरिता विलंब झाला त्यामुळे त्यांचेवर विद्युत आयोगाच्या नियमाप्रमाणे दंड आकारण्यांत यावा व तसेच पोलच्या वाहतूकीचा खर्च देण्यांत यावा अशी विनंती केली.

गैरअर्जदाराने आपल्या तोंडी निवेदनात सांगीतले की अगोदरच लेखी खुलासा सादर करून सर्व बाबी स्पष्ट केलेल्या आहेत व संपूर्ण बाबी बरोबर आहेत त्यांनी हे ही सांगीतले की ग्राहकाचा जेष्ठता क्रं. 125 होता व सामानाची अपूरी कमतरता व अन्य अडचणी त्यामुळे हया ग्राहकाला जेष्ठता यादी डावलून विज पूरवठा देणे शक्य नव्हते तसेच मा. मंचाच्या आदेशानुसार विज पुरवठा दिलेल्या मुदतीत देता आले नाही हयाबद्ल दिलगीरी सुध्दा व्यक्त केली.

गैरअर्जदाराने हे सुध्दा नमुद केले आहे की तांत्रीक संचालक हयांनी पत्र क्रं. अअ/टीआरसी/ 22052/ दि. 02.07.2005 हयांनी मा. राज्य विज आयोगाला कळविले आहे की विद्युत मंडळ फक्त दरवर्षी फक्त 50,000 हजार विद्युत ग्राहकालाच विद्युत पूरवठा करू शकते. अशा प्रकारचे पत्र मा. आयोगास पाठविले होते. तसेच या पत्रासोबत ग्राहक गा–हाणे निवारण मंच नागपूर शहर परिमंडळ, नागपूर यांचे आदेशाची प्रत जोडण्यात आली असून खालील बाबीचा समावेश केला आहे. (CGRF Nagpur has recently passed an order where in MSEDCL has been directed to release connection of Agricultural consumer as per SOP. It is very difficult to release the connection with one month. Secondly, the seniority list of the agricultural consumers and its chronology will be disturbed if this connection is released as per CGRF order.

अशा आशयाचे पत्राची प्रत सुध्दा जोडलेली आहे व हयांच मुद्यावर त्यांनी विशेष भर दिला.

गैरअर्जदाराने शेवटी विनंती केली की वरील अडचणी लक्षात घेता झालेला विलंब हा खरोखरच तांत्रीक अडचणीमुळे झालेला आहे व तो जाणून बुजुन झालेला नाही त्यामुळे त्याकरिता जबाबदार धरण्यांत येवू नये व कोणताच दंड आकारण्यांत येवू नये.

मंचापुढे दोन्ही पक्षांनी सादर केलेली कागदपत्रे, पुरावे तपासले आणि दोन्ही पक्षांचे लिखित व तोंडी म्हणने ऐकुन घेवून मंचानी दोन्ही बाजुचा विचार करून खालील निर्णय घेतला.

## निर्णय

1) विद्युत पंपाकरीता केलेला पोल वाहतूकीचा खर्च ग्राहकाला देण्यांत यावा.

2) अर्जदाराने नुकसान भरपाई देण्याकरीता केलेली विनंती खारीज करण्यांत येत आहे.

| | |
|---|---|
| सही / – | सही / – |
| (एस.एफ. लांजेवार) | (श्रीमती गौरी चंद्रायण) |
| सदस्य – सचिव | सदस्या |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM
**MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION CO LTD's**
NAGPUR URBAN ZONE, NAGPUR.

सदस्य–सचिव
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.